# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 31/ 05/2022**

### अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/०५/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०५ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन ७१,२००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

### दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री कर अंतर्गत दिनांक ३०/०५/२०२२ रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अतंर्गत एकुण ०३ ठिकाणी छापा मारून कार्यवाही करून आरोपीतांकडुन ७.६५ लिटर दारू असा एकुण ३,४००/—रू कि.अं ची अवैध दारूचा साठा व एक मोसा जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

### गोर गरिब जनतेस मिळणारा रेशनचा तांदुळ अवैधरित्या वाहतुक करतांना पोलीसांचा छापा :—

दिनांक ३०/०५/२०२२ रोजी फिर्यादी नामे दिक्षा चंपतराव लोकडे वय ३३ व्य. नौकरी सपोनि पोस्टे सेनगाव ता सेनगाव जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे सेनगाव येथे कलम ३,७, ई.सी.ॲक्ट १९५५ प्रमाणे गुन्हा नोंद झाला असुन यातील आरोपीतांनी संगणमत करून शासनाकडुन गोर—गोरीबांना जनतेस अल्पदरात मिळणारा राशन माल तांदळाचा माल हा काळया बाजारात चढत्या दराने स्वताचे आर्थिक फायदयासाठी विक्री करण्यासाठी खाजगी वरील नमुद वाहनामध्ये ४० पोते तांदुळ किंमत अंदाजे एकुण ४,७०,००० रूपये असा मुदेमाल रिसोड येथे घेवुन जात असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल होवुन अधिक तपास सेनगाव पोलीस करत आहेत.

### अैवधरित्या गुटखा विक्री करणाऱ्यावर पोलीसांचा छापा :—

दिनांक ३०/०५/२०२२ रोजी फिर्यादी नामे चंद्रशेखर आनंदराव कदम वय ४८ व्य.पोलीस निरीक्षक पोस्टे वसमत शहर यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसतम शहर येथे कलम ३२८,२७२,२७३,१८८,भादवी सह कलम २६(२)(प),२६(२)(पअ), २६(२)(ई),३०(२)(अ)५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ प्रमाणे गुन्हा नोंद झाला असुन यातील आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला व नमुद गुटखा व गुटखा जन्य पदार्थ हा मानवी स्वास्थास अपायकारक आहे हे महित असतांना सुध्दा स्वत:च्या फायदयासाठी स्वत:च्या घरात विक्री करण्याचे उदेशाने वरील वर्णनाचा प्रतिबंधीत गुटखा एकुण किंमत २७,३३६ रूपये असा माल मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल होवुन अधिक तपास वसतम शहर पोलीस करत आहेत.